# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४० ००१(म.रा.)

जा.क्र.मपमविवि/आस्था-४/पदोन्नती/ ३३४६ /२०१६ दिनांक : ०१/१०/२०१६

## आदेश

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर १९९८ मधील कलम १७ (१०) अन्वये मा. कुलगुरु महोदयांना प्राप्त अधिकारानुसार तसेच विद्यापीठ परिनियम २००२ मधील परिनियम ७६ अन्वये गठीत निवड समितीने शिफारस केलेल्या खालील कार्यरत **"अधिदान व लेखाधिकारी" (वेतन बँड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४४००)** यांना **"सहाय्यक नियंत्रक" (वेतन बँड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४६००)** या पदावर नियमित पदोन्नती देण्यात येत असून त्यांच्या नावासमोर रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयामध्ये त्यांची पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिदान व लेखाधिकाऱ्याचे नांव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | पदोन्नतीने नियुक्तीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. व्ही. पी. मानकर | पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर | खुला | मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई |
| २. | श्री एस. जी. काटकर | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | खुला | पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी |
| ३. | श्री आर. एस. किर्तने | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | अनुसूचित जाती | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर |

१. या आदेशाद्वारे **"अधिदान व लेखाधिकारी"** यांना **"सहाय्यक नियंत्रक"** या पदावरील नियमित पदोन्नती त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा, अफरातफर, नैतिक अध:पात वा अन्य स्वरुपाच्या गंभीर आरोपाखाली कार्यवाही चालू नाही तसेच कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही, या धारणेच्या अधीन राहून तसेच खालील अटीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

२. पदोन्नत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा विद्यापीठ अधिनियम, परिनियम, म.ना.से. नियम, सेवा शर्ती व विद्यापीठाद्वारे वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहतील.

३. सदरील आदेश तात्काळ अंमलात येतील. या आदेशाद्वारे पदोन्नत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना संबंधीत कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुखांनी तात्काळ कार्यमुक्त करुन विद्यापीठास अहवाल सादर करावा. तसेच पदोन्नत अधिकारी / कर्मचाऱ्यांनी पदस्थापना केलेल्या कार्यालयात / विभागात तात्काळ रुजू व्हावे.

४. सदर आदेशाद्वारे वर नमुद अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती भविष्यात चुकीची आढळून आल्यास, सदर आदेश रद्द करण्याचे तसेच त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सदर आदेशामध्ये फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

५. अधिकारी / कर्मचाऱ्याची मागासवर्गीय प्रवर्गातून पदोन्नती झालेली असल्यास कार्यालय प्रमुखाने पदोन्नत अधिकारी / कर्मचा-यांकडून मुळ जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी करुन स्वाक्षांकित प्रत प्राप्त करुन घ्यावी आणि त्यानंतरच सदर अधिकारी / कर्मचाऱ्यास कार्यालयात रुजू करुन घ्यावे.

६. वरील पदोन्नत अधिकारी / कर्मचाऱ्यांनी ही कायमस्वरुपी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ३०३/का.१२ दिनांक १२/९/२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी. (यासंदर्भात विद्यापीठ परिपत्रक क्र मपमविवि/आस्था-४/३०६२/२०१६ दिनांक १९/९/२०१६ चे अवलोकन करावे.)

कृमाप ......

७. वरील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावरील त्यांच्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा, अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील ११ (१) (ए) खालील तरतुदीनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवून केली जाईल.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर विद्यापीठ आदेश विद्यापीठाच्या mafsu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

**मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीनुसार.**

**स्वाक्षरीत/-**
**कुलसचिव**
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर

**प्रत माहितीस्तव**

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान शाखा),महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
२. मा. संचालक, संशोधन,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
३. मा. संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव -**

१. नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
२. सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
३. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
४. सहयोगी अधिष्ठाता, मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई
५. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
६. आहरण व संवितरण अधिकारी, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर/मुंबई/नागपूर/परभणी
७. आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
८. अधिदान व लेखाधिकारी, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर/मुंबई/नागपूर/परभणी
९. अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
१०. उपकुलसचिव /आस्थापना विभाग, (आस्था-२)/(आस्था-३)/बिंदुनामावली, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

प्रत -

१. श्री. व्ही. पी. मानकर, अधिदान व लेखाधिकारी यांना सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर यांचे मार्फत.
२. श्री एस. जी. काटकर, अधिदान व लेखाधिकारी यांना नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे मार्फत.
३. श्री आर. एस. किर्तने, अधिदान व लेखाधिकारी यांना नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे मार्फत.
४. मा. कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
५. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
६. वैयक्तिक नस्ती

उपकुलसचिव
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**नागपूर**